एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०
नि. क्रमांक. ०९ खाली.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

माझे नाव :– जयेश नामदेव शेटे,

वय सुमारे :– ३२ वर्षे, व्यवसाय :– शेती व ट्रान्सपोर्ट व्यवसाय,

निवासस्थान :– शेटेवाडी, ता. मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

०१. दि. ०३/०२/२०२० रोजी ०४.३० वा. च्या सुमारास पोलीसांनी मला कान्हे फाटा येथे ब्लॉसम हॉटेलजवळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. पंचनामा हा अपघातासंबंधी होता. अपघात हा माझे मामा श्रीपत माधव ठाकर यांचा घडला होता. घटनास्थळावर एक गांधी टोपी व दोन बुट व एक ब्रीझा गाडी नों. क्र. एम एच १४ एच के ९६६९ होती. ब्रीझा गाडी समोरील डाव्या बाजूकडून चेपलेल्या अवस्थेमध्ये होती.

०२. घटनास्थळाच्या पुर्व पश्चिमेस पुणे मुंबई महामार्ग होता. दक्षिणेस इको व्हॅली सोसायटी होती. उत्तरेस ब्लॉसम हॉटेल आहे. अपघाताची घटना हि पुणे– मुंबई महामार्गावर घडली होती. अपघात हा उत्तर बाजूस साईड पट्टीवर घडला होता. माझ्यासोबत दुसरे पंच विजय ढवळे हे हजर होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा माझ्यासमक्ष तयार केला होता. घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास या अगोदरच **नि क्र.१२/क** देण्यात आलेला आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०३. मयत इसम हे माझे मामा होते. लक्ष्मण ठाकर हे माझे नातेवाईक नाहीत. अपघात हा सुमारे सकाळी १०.४५ च्या सुमारास घडला होता. घटना घडली त्यावेळी मी घटनास्थळावर हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघातानंतर अपघात करणारे वाहन हे घटनास्थळावरुन हलवले होते. घटनास्थळाचा पंचनामा हा ४.४५ ते ५.३० पर्यंत चालला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील दुसरे पंच विनायक ढवळे हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनाम्यासाठी पोलीस ठाण्यात गेलो होतो. घटनास्थळ पंचनाम्यासाठी पोलीस हे घटनास्थळी ४.३० वा. च्या सुमारास आले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस घटनास्थळी आल्यानंतर मी घटनास्थळी आलो होतो.

०४. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा पोलीसांनी पोलीस ठाण्यात तयार करुन घटनास्थळी आणला होता. हे म्हणणे खरे नाही की, मयत हे माझे नातेवाईक असल्यामुळे मी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2025.12.12 13:01:53 +0530

**दिनांक. १२/१२/२०२५**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०
**नि. क्रमांक. ०९ खाली.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

माझे नाव :– विजय यादवराव ढवळे,

वय सुमारे :– ४४ वर्षे, व्यवसाय :– नोकरी,

निवासस्थान :– सांगिशे, ता. मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

०१. दि. ०३/०२/२०२० रोजी ०४.४५ वा. च्या सुमारास पोलीसांनी मला कान्हे फाटा येथे ब्लॉसम हॉटेलजवळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. पंचनामा हा अपघातासंबंधी होता. घटनास्थळ हे मला लक्ष्मण नारायण ठाकर या इसमाने दाखवले होते. घटनास्थळावर मला एक गांधी टोपी, दोन बुट तसेच एक राखाडी रंगाची ब्रीझा गाडी नों. क्र. एम एच १४ एच के ९६६९ जीचा डाव्या बाजूचा हेडलाईटचा पत्रा तुटलेल्या अवस्थेत दिसला.

०२. घटनास्थळाच्या पुर्व पश्चिमेस पुणे मुंबई महामार्ग होता. दक्षिणेस महालक्ष्मीचे मंदीर, इको व्हॅली सोसायटी होती. उत्तरेस ब्लॉसम हॉटेल व पेट्रोल पंप होता. माझेसोबत पंचनाम्यासाठी दुसरे पंच जयेश शेटे हे हजर होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा माझ्यासमक्ष तयार केला होता. घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि क्र.१२/क** देण्यात येते. दुसरे पंच जयेश शेटे यांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली होती.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०३.	मी मामासाहेब खांडगे सहकारी पतसंस्था तळेगाव दाभाडे येथे नोकरीस आहे. माझ्या कामाची वेळ ही सकाळी ९.३० ते सायंकाळी ०५.०० अशी आहे. लक्ष्मण ठाकर हे माझे नातेवाईक असल्यामुळे मी त्यांना गेली दहा वर्षांपासून ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण ठाकर यांनी सांगितल्यामुळे मी पंचनाम्यास गेलो होतो. घटनास्थळ पंचनामा हा ४.४५ ते ५.३० पर्यंत चालला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा पोलीसांनी अगोदरच लिहीला होता. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी ४.२० वा. फोन केला होता.

०४.	हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा पोलीस ठाण्यात तयार केला होता व मी पोलीस ठाण्यात पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण ठाकर हे माझे नातेवाईक असल्यामुळे मी पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी घटनास्थळावर हजर नव्हतो. त्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2025.12.12 13:01:59 +0530

**दिनांक. १२/१२/२०२५**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०

नि. क्रमांक. ०९ खाली.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

माझे नाव :– लक्ष्मण नारायण ठाकर,

वय सुमारे :– ४५ वर्षे, व्यवसाय :– शेती,

निवासस्थान :– कान्हे फाटा, वडगाव, ता. मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

०१. दि. ०३/०२/२०२० रोजी माझे चुलते श्रीपती ठाकर हे घरामधून पायी चालत कान्हे फाटा येथे चालले होते. माझे चुलते चालत ब्लॉसम हॉटेल येथे आले असता त्यांना पाठीमागून येणा–या ब्रीझा या चारचाकी वाहन नों. क्र. एम एच १४ एच के ९६६९ या वाहनाने ठोकर मारली. अपघात हा सकाळी १०.४५ च्या सुमारास घडला होता. अपघाताची घटना मी मंदीरात गेलो असता मला एक फोन आला होता त्यामुळे समजली होती. फोन आल्यानंतर मी अपघातस्थळी गेलो होतो. अपघात करणारे वाहन कामशेतकडून वडगाव येथे येत होते. अपघात हा मुंबई पुणे महामार्गावर घडला होता.

०२. मी अपघातस्थळी आलो असता माझ्या चुलत्यांचा अपघातस्थळीच मृत्यू झाला होता. अपघात करणारे वाहन हे आरोपी शशीकांत कुटे हे चालवत होते. शशीकांत कुटे यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो कारण ते माझ्या गावातीलच रहिवाशी आहेत. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. अपघाताची माहिती मी पोलीसांना कळवली. पोलीसांनी माझ्या चुलत्यास शवविच्छेदनासाठी दवाखान्यात नेले. अपघाताबाबत खबर मी पोलीस ठाण्यात नोंदवली होती. आता मला मी नोंदवलेली खबर दाखवण्यात आली. खबरेवर माझी सही आहे. खबरेतील मजकूर खरा व बरोबर आहे. खबरेस **नि क्र. १०/क** देण्यात येतो. छापील खबरेवर माझी सहि आहे. छापील खबरेतील मजकूर खरा व बरोबर आहे. छापील खबरेस **नि क्र. ११/क** देण्यात येतो.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. विश्वनाथ जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०३. पुणे मुंबई रस्ता हा पुर्व – पश्चिम असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, हॉटेल ब्लॉसमच्या पुढे टाकवे गावचा चौक आहे व टाकवे गावाकडून येणारी वाहने हि मुंबईकडे जातात. हे म्हणणे खरे नाही की, टाकवे चौकामध्ये पेट्रोल पंप आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुणे शहराकडून येणारी वाहने ही मुंबईकडे तसेच टाकवे गावाकडे जातात. हे म्हणणे खरे आहे की, टाकवे चौकामध्ये स्पीड ब्रेकर आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अपघात हा टाकवे चौकामध्ये झाला नसून ब्लॉसम हॉटेलसमोर झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, टाकवे येथे चौक असल्यामुळे पुण्याकडून येणारी वाहने व मुंबईकडून येणारी वाहने हि कमी गतीमध्ये चालतात.

०४. अपघाताच्या वेळी मी मंदीरामध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघात हा १०.४५ वा. घडला होता व मी घटनास्थळी ११.०० वा च्या सुमारास आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. मयत हे माझे चुलते होते. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत इसम माझे चुलते असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी खबर नोंदवलेली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2025.12.12 13:02:08 +0530

**दिनांक. १२/१२/२०२५**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**